





# हॅप्पी पेरेंटिग : गणपती बाप्पा आणि बहुआयामी बुद्धिमत्ता

डॉ. सुनील गोडबोले, बालविकास तज्ज्ञ.

सकाळ: कुटुंब (23 September 2023)

होवार्ड गार्डनरनं अष्टपैलू, बहुआयामी बुद्धिमत्तेची संकल्पना मांडली आहे. आता या बहुआयामी बुद्धिमत्तेचा गणेशोत्सवाशी संबंध काय? खरंतर आपलं मूल अष्टपैलू होण्यासाठी गणपती बाप्पा खूप काही देऊ शकेल.

१. **शारीरिक गतिबोधक :** चौरस आहार आणि भरपूर व्यायाम या २ गोष्टी शारीरिक विकासासाठी आवश्यक. गणपतीसमोरचा प्रसाद १० दिवस जरी आपल्या मुलांना खायला घातला, तरी मुलांचा तब्येतीत फरक जाणवेल. उकडीचे मोदक, आरतीनंतरची पंचखाद्यांची खिरापत, फळं हे सगळंच चविष्ट व पूर्णाहार आहे.
२. **तार्किक गणिती :** गणेशोत्सवाचं आयोजन हेच एक तार्किक - गणिती बुद्धिमत्तेला आव्हान देणारं असतं. वर्गणी गोळा करण्यापासून, पैशांचा विनियोग, हिशेब ठेवणे हे आनंददायी गणितच आहे.

३. **अवकाशीय/ दृश्यात्मक :** रेडिमेड मंदिरांपेक्षा घरात/ आजूबाजूला मिळणाऱ्या साध्या सोप्या वस्तूंमधून गणपतीची आरास हे त्रिमीतीय ज्ञान व त्याच वेळेस सौंदर्य याचा सुंदर मिलाफ आहे. त्यात रोज वेगळी आरास व कौतुकाची थाप मिळाली तर आणखीनच छान!

४. **सांगीतिक :** स्वर-ताल-लय मुलांच्या नसानसात भिनलेली असते. ढोल ताशांच्या पथकात ठेका धरून वाजवणारी मोठी मुलं असोत किंवा आरत्या तालासुरात म्हणणारी मुलं असोत किंवा गुणदर्शनाच्या कार्यक्रमात गाणं असो - सगळीच सांगीतिक बुद्धिमत्ता विकासाची नांदी म्हणता येईल.

५. **भाषिक :** गणपतीच्या पूजेतील 'अथर्वशीर्ष' जर मुलांनी खणखणीत म्हटलं, तर 'स्पष्ट शब्दोच्चाराची' सर्वोत्तम तयारी होईल. ओंकाराचे श्वसनसंस्थेवरचं नियंत्रण हेही शास्त्रसिद्ध आहेच.

६. **निसर्गविषयक :** पूजेसाठी प्रत्यक्ष निसर्गात जाऊन 'पत्री आणि फुलं' गोळा करायला मुलांना पाठवलं, तर निसर्गाची जवळीक तर वाढेलच; पण बरोबरीनं वनस्पतिशास्त्राची तोंडओळखही होईल.

७. **आंतरव्यक्ती बुद्धिमत्ता** : गणेशोत्सवाच्या निमित्तानं एकमेकांकडे जाणं-येणं, शाळेतील, सोसायटीतील आणि सार्वजनिक मंडळांतील वेगवेगळ्या कार्यक्रमात सहभाग हा नकळतच दुसऱ्यांच्या विचारांची जाणीव निर्माण करतो.

८. **व्यक्तिअंतर्गत बुद्धिमत्ता :** डोळस श्रद्धा- मग ती गणपतींवर असो किंवा आईवडिलांवर असो- ही श्रद्धा आणि बरोबरीनं प्रार्थना ही स्वतःबद्दलची जाणीव प्रगल्भ करते.

पालकमित्रांनो, गणपती ही बुद्धीची देवता म्हणतात, त्याचा हा बहुआयामी अर्थ तुम्हाला नक्कीच जाणवत असेल!

(लेखक ज्येष्ठ बालविकासतज्ज्ञ आहेत.)

www.chiranjeevgodbole.com